**न्यायाधीश सहकार न्यायालय, अहमदनगर यांचे न्यायालयात.**
**(न्यायाधीश, सौ.ए.व्ही.जाधव - यांचेसमोर)**

**लवाद मु.नं. ०१/२०१८**

श्री. संभाजी राजाराम घुटे ---- **अर्जदार**

***विरुध्द***

१) श्रीगोंदा तालुका खरेदी विक्री संघ मर्यादीत., व इतर. ---- **गैरअर्जदार**

**निशाणी -५ वरील आदेश**

(दि. ०३/०१/२०१८ रोजी पारीत)

१) वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असुन कथन केले आहे की, ते प्रतिवादी क्र. १ संस्थेचे चेअरमन असुन त्यांनी त्यांच्या चेअरमन पदाचा कधीही राजीनामा दिलेला नाही. परंतु असे असतांनाही प्रतिवादींनी हातमिळवणी करुन त्यांचा खोटा व बनावट राजीनामा दिल्याचे भासवून नवीन चेअरमन निवडीबाबतचा खोटा प्रस्ताव प्रतिवादी क्र. ३ यांच्याकडे दाखल केला व प्रतिवादी क्र. ३ यांनी दि.२६/१२/२०१७ रोजी प्रतिवादी क्र. १ या संघाचे चेअरमन निवडीबाबतची सभा दि.०४/०१/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, श्रीगोंदा यांच्या कार्यालयात ठेवण्यात आली, आणि म्हणुन वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन मुळ दाव्याचा गुणदोषावर चौकशी होऊन अंतिम निकाल लागे पावेतो प्रतिवादी क्र.३ यांनी प्रतिवादी क्र.१ संस्थेच्या चेअरमन पदाच्या निवडीची दि.०४/०१/२०१८ रोजीची ठेवलेली सभा स्थगित करण्यात यावी अशी विनंती केली.

२) प्रतिवादी यांना नोटीस व समन्सची बजावणी झाल्यानंतर प्रतिवादी क्र. १ व २ हे हजर झाले व त्यांनी निशाणी-१४ वर अर्जास म्हणणे दिले व कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ३ यांच्या कार्यालयाकडे दि.१५/१२/२०१७ रोजी कोणताही प्रस्ताव दाखल केलेला नाही व

दि.१४/१२/२०१७ रोजी झालेल्या सभेत विषय क्र. ५ हा संस्थेच्या गट नं. ९२५ मधील रस्त्याचे नवीन काम बंद करण्याच्या विषयाची संस्थेचे संचालक श्री. दिपकराव भोसले यांनी सुचना मांडली व सदर विषयावर चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला. दि.१४/१२/२०१७ मधील विषय क्र. ५ (१) नुसार राजीनाम्याचा कोणताही ठराव पारित करण्यात आलेला नसुन सदरचा राजीनामा मंजुर झाल्याचा खोटा व बनावट ठराव तयार करुन त्या प्रस्तावावर मॅनेजर यांच्या खोटया सहया करुन सदरचा प्रस्ताव प्रतिवादी क्र. ३ यांच्या कार्यालयाकडे दाखल केला असवा. तसेच दि.०४/०१/२०१८ रोजीच्या सभेबाबतचा कोणताही अजेंडा माझ्या सहीने काढलेला नाही असेही कथन केलेले आहे. आणि म्हणून प्रतिवादी विनंती करतात की, अर्जातील मागणी मंजुर करण्यात यावी.

३) प्रतिवादी क्र. ३ यांनी निशाणी-२१ वर मनाई हुकूमाच्या अर्जास म्हणणे दाखल केले असुन कथन केले आहे की, दि.१५/१२/२०१७ रोजीच्या जा.क्र. ५२१२२ नुसार श्री. जाधव व श्री.जगताप प्रतिवादी क्र. १ संस्थचे मॅनेजर यांनी चेअरमन निवड करण्यासाठीचा प्रस्ताव सहाय्यक निबंधक यांच्या कार्यालयास दि.१६/१२/२०१७ रोजी सादर केला असुन त्यामध्ये नमुद केले की, संघाचे चेअरमन यांनी राजीनामा दिलेला असल्याने व तो मंजुर करुन त्याबाबत ठराव झाला असल्याने उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगान जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी अहमदनगर यांनी दि.१९/१२/२०१७ रोजी प्रतिवादी क्र. ३ यांची अध्यासी अधिकारी म्हणुन नियुक्ती केली आहे. सदर पत्र प्राप्त झल्यानंतर चेअरमन निवडणुकीच्या सभेचा अजेंडा काढण्यासाठी प्रतिवादी क्र. ३ यांनी दि.२०/१२/२०१७ रोजी मॅनेजर यांना पत्र देवून दि.२६/१२/२०१७ रोजी संघाचे चेअरमन निवड सभा दि.०४/०१/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता घेणे बाबत सभेचा अजेंडा निर्गमीत करण्यासाठी सभा अजेंडा नमुन्यासह संघाचे मॅनेजर

यांना दिलेला आहे. याबाबत संघाचे मॅनेजर हे संघाचे जबाबदार कर्मचारी असल्याने त्यांनी सादर केलेल्या माहितीच्या व कागदपत्रांच्या अधीन राहून प्रतिवादींनी उपरोक्त कार्यवाही केलेली आहे. सदर प्रस्ताव बोगस किंवा बनावट आहे हे ठरविण्याचे अधिकार सहाय्यक निबंधक यांना नसल्याने व त्याबाबत कार्यालयात कोणतीही लेखी तक्रार प्राप्त नसल्याने उपरोक्त कार्यवाही करण्यात आली. आणि म्हणून अर्जावर योग्य तो न्यायोचित आदेश करावा असे ते विनंती करतात.

४) प्रतिवादी क्र. ५ व ८ यांनी निशाणी-२६ वर मनाई अर्जास लेखी म्हणणे दिले असुन कथन केले आहे की, संस्थेची संचालक मंडळाची मासिक सभा दि.१४/१२/२०१७ रोजी आयोजित करण्यात आली होती व सदर दिवशी सभेच्या विषय पत्रीकेवरील विषय क्र. ५ हा ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करण्याबाबतचा होता. सभेमधे विषय क्र. ५ (१) वर संस्थेच्या गट नं .९२५ मधील रस्त्याचे नवीन काम बंद करण्याबाबत या विषयावर चर्चा करुन सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात आला त्यानंतर सभेचे कामकाज संपलेले असुन इतर कोणताही विषय चर्चेकरिता आला नव्हता. दि.१४/१२/२०१७ रोजीच्या सभेपुढे चेअरमन पदाच्या राजीनाम्याचा विषय कधीही ठेवण्यात आलेला नव्हता. तसेच सदरचा राजीनामा मंजुर करण्याबाबतची सुचना प्रतिवादी क्र. ५ यांनी मांडलेली नसुन अनुमोदन प्रतिवादी क्र. ८ यांनी दिलेले नाही. त्यामुळे वादी यांचा राजीनामा मंजुर करण्याचा प्रश्नच येत नाही. आणि म्हणुन प्रतिवादी विनंती करतातकी प्रतिवादी क्र. २ यांनी प्रतिवादी क्र. ३ यांच्या कार्यालयाकडे सादर केलेला प्रस्ताव मुळता चुकीचा व बेकायदेशीर असल्याने अर्जातील मागणी मंजुर करण्यात यावी.

५) प्रतिवादी क्र. ४, ६, ९ ११, १३ ते १५ यांनी निशाणी-३५ वर अर्जास म्हणणे व कैफियत दाखल केली असुन दाव्यातील कथने नाकारलीत व कथन केले की, प्रतिवादी क्र. १

संस्थेचे चेअरमन श्री. संभाजी राजाराम घुटे यांनी दि.१३/१२/२०१७ रोजी राजीनामा दिला असुन तो १४/१२/२०१७ रोजीच्या सभेमध्ये मंजुर करण्यात आला. सदर सभेला प्रतिवादी क्र.४, ६ व १५ हे हजर होते व त्यांनी इतिवृतावर सह्याही केलेल्या आहेत. प्रतिवादी क्र. १ हा संघ तालुक्याचे खरेदी विक्री संदर्भात काम पाहत असल्याने व मोठा संघ असल्याने सदरची बातमी दैनिक सकाळ या वर्तमान पत्रात दि.१९/१२/२०१७ रोजी प्रसिध्द झालेली होती. तसेच त्या संबंधीचा प्रस्ताव सहाय्यक निबंधक यांच्याकडे दाखल केल्याने नवीन चेअरमन पदाच्या निवडीचा अजेंडा प्रसिध्द करण्यात आला.

६) दि १३/१२/२०१७ रोजी वादी यांनी राजीनामा दिल्यानंतर सदर अनुमोदक व सुचक यांच्या असे निदर्शनास आले की, सदरचे चेअरमन अल्पमतात आल्याने सदरची संस्था आपल्या अधिपत्याखाली राहणार नाही आणि म्हणुन जाणिवपुर्वक खोटया कथनाचा वादी यांनी सदरचा अर्ज दाखल केला. प्रतिवादींच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. १ संस्था वादी यांच्या ताब्यात असल्याने प्रतिवादी क्र. १ व २ यांच्याशी हातमिळवणी करुन रेकॉर्डमध्ये बरेचसे कागद अदला बदल करुन खोटया कथनाच्या आधारे प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. तसेच वादी यांनी पोटनियम दाखल केलेले नसुन राजीनामा मंजुर करण्यासाठी सात दिवस थांबण्याची तरतुद नाही असेही ते कथन करतात.

७) प्रतिवादी पुढे असेही कथन करतात की, दि.२६/१२/२०१७ च्या सभेच्या अजेंडया संदर्भात आवक रजिस्टर दाखल केले. परंतु जावक रजिस्टर दाखल केले नाही. प्रतिवादी क्र. ५, ८, १ व २ यांनी वादी यांच्या दबावाला बळी पडून त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे व ते एकमेकाला पुरक असे आहे. वादी यांचा राजीनामा कायद्याप्रमाणे मंजुर झालेला असतांनाही प्रतिवादी क्र. १ व २ यांनी अफरातफर करुन खोटे प्रोसिडींग बुक

न्यायालयात दाखल केले आहे. आणि म्हणुन प्रतिवादी विनंती करतात की, वादीचा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा.

८) अर्जदाराचा अर्ज व त्यासोबत दाखल दस्त तसेच प्रतिवादी यांचे जबाब यांचा विचार करता निशाणी-५ वरील अर्जाच्या न्यायिकदृष्ट्या निपटारा करणेकरीता माझे समोर खालीलप्रमाणे प्रश्न उपस्थित होतात. ते प्रश्न व त्याची सविस्तर कारणमिमांसा पुढे दिलेली आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्श** |
|---|---|
| १) वादी/अर्जदार त्यांची बाजू प्रथम दर्शनी आहे असे शाबित करतात काय? | ---- होय. |
| २) सदरच्या अर्जाचा न्यायिक समतोल वादीचे बाजुने आहे काय? | ---- होय. |
| ३) सदरचा अर्ज नामंजुर केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल काय? | ---- होय. |
| ४) आदेश काय? | ---- अंतिम आदेशाप्रमाणे. |

९) वादीतर्फे वकील श्री. एम.बी.आंबेकर, प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे वकील श्री.ए.वाय.गुंड पाटील, प्रतिवादी क्र. ३ तर्फे वकील श्री. वाय.बी. नेमाणे, प्रतिवादी क्र.४, ६, ९, ११, १३ ते १५ तर्फे वकील श्री. एस.ए.दिवटे व वकील श्री.सुनिल भोस, प्रतिवादी क्र. ५ व ८ तर्फे वकील श्री.ओ.पी.पाटील यांचा युक्तिवाद ऐकला.

## कारणमिमांसा

१०) वादीचा अर्ज निकाली काढण्याकरिता दाव्यातील कथने, वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेले दस्त व त्यांनर केलेल्या युक्तिवादाचे बारकाईने अवलोकन केले.

११) वादींनी निशाणी-३ सोबत दि.०६/१२/२०१७ रोजीचा सभेचा अजेंडा दाखल केलेला असुन त्यामध्ये विषय क्र. ५ ***'ऐनवेळी येणाऱ्या विषयावर विचार विनिमय करणे'*** हा आहे. वादीचे वकील श्री. एम. बी. आंबेकर यांच्या युक्तिवादानुसार वादी यांनी कधीही राजीनामा दिलेला नसुन प्रतिवादींनी हातमिळवणी करुन खोटा राजीनामा तयार केलेला आहे व तथाकथीत दाखल केलेल्या राजीनाम्याच्या तारखेत खाडाखोड केली असुन राजीनामा दि.१३/१२/२०१७ रोजीचा दाखविला असुन चेअरनमन पदाचा राजीनामा दि.१४/१२/२०१७ रोजी देत आहे असे त्यात नमुद केले आहे. या दोन्ही तारखेमध्ये खाडाखोड केलेली आहे. असे ते युक्तिवाद करता.

१२) यावरुन वादींनी निशाणी-३ वर दाखल केलेल्या राजीनाम्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये नमुद केलेल्या तारखांमध्ये खाडाखोड केल्याचे दिसुन येते तसेच राजीनाम्यामध्ये राजीनामा देण्याचे कोणतेही कारण नमुद केलेले नाही. वादींनी निशाणी-३ सोबत दि.१४/१२/२०१७ रोजीच्या ठरावाचे प्रोसिडींग बुक दाखल केले असुन प्रतिवादी क्र. २ संस्थेचे सचिव यांनी मुळ प्रोसिडिंग बुक दाखल केले आहे त्यातील विषय क्र. ५ मधील ठराव क्र. ५ (१) चे अवलोकन केले असता सदर ठराव हा संस्थेचे गट नं. ९२५ मधून नगर परिषदेमार्फत नवीन रस्ता रुंदीकरणाचे काम बंद करण्याबाबतचा ठराव असुन वादींच्या राजीनामा दिल्याबाबत किंवा मंजुर केल्याबाबत त्यामध्ये काहीही नमुद केलेले नाही.

१३) युक्तिवादा दरम्यान प्रतिवादींचे वकील श्री.एस.ए. दिवटे युक्तिवाद करतात की, प्रोसिडींग बुकच्या कागदपत्रांमध्ये अदलाबदल केलेली असुन त्यांनी, पान क्र. ९६ व ९७ हे वेगळया रंगाचे असुन इतर प्रोसिडींग बुकची पाने ही वेगळया रंगाची असल्याबाबत

न्यायालयाचे लक्ष केंद्रित केले. परंतु प्रतिवादींच्या वकीलांनी उपस्थित केलेली बाब पुराव्याचा भाग असुन पुरावा नोंदविल्याशिवाय ती बाब निकाली काढता येणार नाही.

१४) प्रतिवादी क्र. ३ यांनी निशाणी-२३ च्या यादी सोबत कागदपत्र दाखल केली असुन अ.क्र. १ वर दि.२६/१२/२०१७ रोजीचा सभेचा अजेंडा असुन तो प्रतिवादी क्र. १ संस्थेचे सचिव यांनी काढलेला असुन यानुसार दि.०४/०१/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था श्रीगोंदा यांच्या अध्यक्षतेखाली प्रतिवादी क्र. १ संस्थेच्या चेअरमन पदाची निवड करण्यासाठी बोलविलेल्या सभेबाबतचा आहे. तसेच दि.१५/१२/२०१७ रोजी प्रतिवादी क्र. १ संस्थेचे मॅनेजर यांनी सहाय्यक निबंधक, श्रीगोंदा यांच्याकडे चेअरमन पदाच्या निवडीबाबतचा प्रस्ताव पाठविल्याचे दिसुन येते. प्रतिवादी क्र. २ यांच्या अर्जात दिलेले म्हणणे व युक्तिवादाचे अवलोकन केले असता त्यांच्या म्हणण्यानुसार वादी यांनी कोणताही राजीनामा दिलेला नसुन राजीनामा मंजुरीचा ठराव झालेला नाही व त्यासंबंधीचा कोणताही प्रस्ताव मॅनेजर/सचिव यांनी प्रतिवादी क्र. ३ यांच्याकडे पाठविलेला नाही. आणि म्हणुन प्रतिवादी क्र. ३ यांनी दाखल केलेले दस्त यावर पुरावा घेऊन ती गुणदोषाच्या आधारे निकाली काढल्याशिवाय त्यातील सत्यता पडताळता येणार नाही.

१५) प्रतिवादी क्र. ४, ६, ९, १२, १३ ते १५ यांचे वकील श्री.एस.ए. दिवटे युक्तिवाद करतात की, प्रतिवादी क्र. ४, ६, १५ हे सभेला हजर होते व सभेमध्ये वादीचा राजीनामा मंजुर करण्यात आला होता यासंबंधीचे त्यांनी प्रतिज्ञापत्र दाखल केले असुन त्यांच्या कथनानुसार वादीचा राजीनामा मंजुर झालेला असल्याने व तसा प्रस्ताव सहाय्यक निबंधक यांच्याकडे दिलेला असल्याने दि.०४/०१/२०१८ रोजीची सभा स्थगित करता येणार नाही. प्रतिवादींनी दाखल केलेल्या तिनही प्रतिज्ञापत्राचे व मुळ प्रोसिडींग बुकाचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र.४,

६ आणि १५ दि.१४/१२/२०१७ रोजीच्या सभेला हजर असल्याबाबत त्यांच्या सहया आहेत. परंतु ठराव क्र. ५ चे अवलोकन केले असता तो वादीचा राजीनामा मंजुर केल्यासंबंधीचा दिसुन येत नाही. तसेच त्यासंबंधीचा प्रस्ताव प्रतिवादी क्र. १ संस्थेचे व्यवस्थापक/सचिव यांनी प्रतिवादी क्र. ३ यांच्याकडे दिल्याबाबत कथन नाकारले असून त्यांच्या कोणीतरी खोटया सहया करुन प्रस्ताव पाठविल्याचे कथन केले आहे. सदरच्या बाबी पुराव्याच्या आधारे निकाली काढणे गरजेचे असल्याने वादीच्या बाजूने प्रथमदर्शनी केस कागदपत्रांच्या आधारे दिसुन येते.

१६) प्रतिवादी क्र. ४, ६, ९, १२ १३ ते १५ चे वकील श्री.एस.ए. दिवटे हे युक्तिवाद करतात की, निवडणुकीची प्रक्रिया सुरु झाल्यानंतर कायद्याने त्यास मनाई हुकूम देता येणार नाही यासाठी त्यांनी त्यांच्या या कथनाचे पृष्ठ्यर्थ *Shaji K. Joseph Vs. Viswanath & Ors. [Civil Appeal No. 1629 of 2016 arising out of S.L.P. (C) No.22902 of 2011]* या प्रकरणातील मा. न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची प्रत दाखल केली.

१७) परंतु वरील केस मधील घटना व प्रस्तुतच्या दाव्यामधील घटना हया वेगवेगळया आहेत आणि म्हणुन वरील केस प्रस्तुतच्या दाव्यास लागू नाहीत. प्रस्तुतच्या दाव्यात वादीच्या कथनानुसार त्यांनी राजीनामा दिलेला नसुन त्या आधारे खोटा प्रस्ताव पाठवून प्रतिवादी क्र. १ संस्थेच्या चेअरमन निवडी बाबतची सभा प्रतिवादी क्र. ३ घेत असुन वादी यांनी सदर सभेला मनाई हुकूमाची विनंती केलेली आहे. अशावेळी निवडणुक प्रक्रिया सुरु झाली असे प्रतिवादींचा युक्तिवाद ग्राह्य धरता येणार नाही.

१८) वरील कारणमिमांसेवरुन वादीच्या बाजूने प्रथम दर्शनी केस व न्यायाचा तराजू आहे. दि.०४/०१/२०१७ रोजीच्या सभेस स्थगिती न दिल्यास वादीचे न भरुन येणारे नुकसान

होईल. आणि म्हणून मी मुद्दा क्र. १ ते ३ चा निष्कर्श होय असा देत आहे व मुद्दा क्र. ४ चे उत्तरादाखल खालीप्रमाणे आादेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१) वादीचा निशाणी -५ चा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्र. ३ यांनी प्रतिवादी क. १ संस्थेच्या चेअरमन पदाच्या निवडीची दि.०४/०१/२०१८ रोजी बोलाविलेल्या सभेस स्थगिती देण्यात येत आहे.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

४) आदेश खुल्या न्यायालयात घोषित.

दिनांक : ०३/०१/२०१८
अहमदनगर.

**(सौ.ए.व्ही.जाधव)**
**न्यायाधीश,**
**सहकार न्यायालय, अहमदनगर.**